**प्रेस नोट** **दिनांक ०५/०६/२०१९**

## चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर

### कोलंबिया एशिया हॉस्पीटल मधील डॉक्टर, नर्स व स्टाफ यांची बैठक घेतलेबाबत

दिनांक ०५/०६/२०१९ रोजी १५/३० वा. ते १६.३० वा. दरम्यान मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, यांनी कोलंबिया एशिया हॉस्पीटल, खराडी बायपास रोड, पुणे येथे भेट देऊन त्यांची बैठक घेतली. सदर मिटींगमध्ये कोलंबिया एशिया हॉस्पीटल कडील डॉक्टर, नर्स व स्टाफ यांचेशी सुसंवाद साधुन त्यांना असलेल्या अडीअडचणीबाबत विचारणा करुन त्यांचे निरसन केले. चंदननगर पोलीस स्टेशन हद्दीत कोणत्याही हॉस्पीटलची तक्रार असेल तर त्यांनी पोलीसांशी संपर्क साधावा, त्यांची तात्काळ तक्रार नोंदवुन घेतली जाईल अशी माहीती दिली. तसेच पोलीस आयुक्तालयामध्ये हॉस्पीटल कडील महीलांसाठी १०९१ हेल्पलाईन नंबर बाबत माहीती देऊन कोणत्याही काहीही अडचण असेल तर चंदननगर पोलीस स्टेशन फोन नं. ०२०/२७०१२३२१ किंवा पोलीस कंन्ट्रोल रूम नं. १०० वर संपर्क सांधने बाबत माहिती दिली. तसेच हॉस्प्ीटल समोरील रोडवर उच्च प्रतिचे सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, डीव्हीआरमध्ये त्याचे फुटेज कमीतकमी ३० दिवस राहील याची दक्षता घेणे, सुरक्षा रक्षकाची नेमणुक करावी या सारख्या सुरक्षे संदर्भात सुचना दिल्या. सदर ठिकाणी ८० ते ९० डॉक्टर, नर्स व स्टाफ असा जनसमुदाय हजर होता.

सदरची चांगली कामगीरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक कृष्णा इंदलकर पोहवा. हरीदास कदम, पोना अनिरुध्द जायभाय यांनी केलेली आहे.



